

# मारुती स्तोत्र

भीमरूपी महारुद्रा । वज्रहनुमान मारुती ।
वनारि अंजनीसूता । रामदूता प्रभंजना ॥ १ ॥

महाबली प्राणदाता । सकळां ऊठवी बळें ।
सौख्यकारी शोकहर्ता । धूर्त वैष्णव गायका ॥ २ ॥

दिनानाथा हरीरूपा । सुंदरा जगदंतरा ।
पाताल देवता हंता । भव्य शेंदूरलेपना ॥ ३ ॥

लोकनाथा जगन्नाथा । प्राणनाथा पुरातना ।
पुण्यवंता पुण्यशीला पावना परतोषका ॥ ४ ॥

ध्वजांगें उचली बाही । आवेशें लाटला पुढें ।
कालग्नि कालरुद्राग्नि । देखतां कापती भयें ॥ ५ ॥

ब्रह्मांडें माईल नेणों । आवळे दंतपंगती ।
नेत्राग्नीं चालिल्या ज्वाळा । भृकुटी ताठिल्या बळें ॥ ६ ॥

पुच्छ तें मुरडिलें माथां किरीटें कुंडलें वरी ।
सुवर्ण घटि कासोटी । घंटा किंकिणि नागरा ॥ ७ ॥

ठकारे पर्वताऐसा । नेटका सडपातळू ।
चपलांग पाहतां मोठें । महाविद्युल्लतेपरी ॥ ८ ॥

कोटिच्या कोटि उड्डाणें । झेंपावे उत्तरेकडे ।
मंद्राद्री-सारिखा द्रोणू । क्रोधें उत्पाटिला बळें ॥ ९ ॥

आणिला मागुती नेला । आला गेला मनोगतीं ।
मनासी टाकिले मागें । गतीसी तुळणा नसे ॥१०॥

अणुपासूनि ब्रह्मांडा । एवढा होत जातसे ।
ब्रह्मांडाभोंवत वेढे । वज्रपुच्छ घालवूं शके ॥११॥

तयासी तुळणा कोठें । मेरु मंदार धाकुटे ।
तयासी तुळणा कैशी । ब्रह्मांडीं पाहतां नसे ॥१२॥

आरक्त देखिलें डोळां । गिळिलें सूर्यमंडळा ।
वाढतां वाढतां वाढे । भेदिल शून्यमंडळा ॥१३॥

भूत प्रेत समंधादि । रोगव्याधि समस्तहि ।
नासती तुटती चिंता । आनंदें भीमदर्शनें ॥१४॥

हे धरा पंधरा श्र्लोकी । लाभली शोभली भली ।
दृढ देहो नि:संदेहो । संख्या चंद्रकळा गुणें ॥१५॥

रामदासीं अग्रगणू । कपिकुळासी मंडणू ।
रामरूप अंतरात्मा । दर्शनें दोष नासती ॥१६॥

॥ भीमरूपी स्तोत्र संपूर्ण ॥